भारतीय रिज़र्व बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2019-20/40
एफआयडीडी.सीओ.एलबीएस.बीसी.क्र. 09/02.01.001/2019-20 ऑगस्ट 13, 2019

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक व सीईओ - अनुसूचित वाणिज्य बँका
(प्रादेशिक ग्रामीण बँकांसह), लघु वित्त बँका व पेमेंट्स बँका

महोदय/महोदया,

**थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना - अंमलबजावणी**

कृपया, सामाजिक कल्याण लाभांचे, लाभार्थीच्या बँक खात्यांमध्ये थेट जमा करण्यास मदत करण्यासाठी आधारच्या वापरासंबंधीचे आमचे परिपत्रक आरपीसीडी.सीओ.एलबीएस.बीसी.क्र.75/02.01.001/2012-13 दि. मे 10, 2013 व आरपीसीडी.सीओ.एलबीएस.बीसी.क्र.11/02.01.001/2013-14 दि. जुलै 9, 2019 चा संदर्भ घ्यावा.

(2) ह्या संदर्भात बँकांना सांगण्यात येते की त्यांनी, खाती उघडणे, आणि सामाजिक कल्याण योजनांखाली पात्रतापूर्ण लाभार्थीच्या थेट लाभ हस्तांतरणासाठी (डीबीटी) उघडण्यात आलेल्या विद्यमान किंवा नवीन खात्यांमध्ये आधार क्रमांक जोडणे/नोंदण्याचे काम, महानिर्देश - तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) निर्देश 2016, (मे 29, 2019 रोजी अद्यावत केल्यानुसार) च्या कलम 16 खालील तरतुदींनुसार व प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग (पीएमएल) नियमावलीच्या विद्यमान तरतुदींना अनुसरुन करावे.

(3) वरील मार्गदर्शक तत्वे, ‘थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना - बँक खात्यांमध्ये आधार क्रमांक नोंदवणे - स्पष्टीकरण’ ह्यावरील परिपत्रक एफआयडीडी.सीओ.एलबीएस.बीसी.क्र.17/02.01.001/2015-16 दि. जानेवारी 14, 2016 रद्द करुन त्याजागी देण्यात आले आहे.

आपला,

(गौतम प्रसाद बोराह)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, 10वा मजला, केंद्रीय कार्यालय भवन, शहिद भगत सिंह मार्ग, पो.बा.सं.10014, मुंबई 400 001 टेलिफोन: 022-22601000 फॅक्स: 91-22-22621011/22619048 ईमेल: cgmincfidd@rbi.org.in

**सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.**